Epaper

दैनिक जन

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

अटकेची लेखी कारणे दिली नाहीत तर पोलीस अधिकाऱ्यावर विभागीय चौकशी

(पान २ वर)



। गुरुवार, दि. २४ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १६५ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

मुंबईचा राजाचं गिरगाव चौपाटीवर ऐतिहासिक विसर्जन होणार

मुंबई : मुंबई गणेशोत्सवाचा मानबिंदू असलेल्या गणेशगल्लीतील 'मुंबईच्या राजा'चे यंदा 99 वे वर्ष आहे. शुक्रवार, 25 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 7 वाजता शेवटची महाआरती करून विसर्जन मिरवणुकीला सुरुवात होईल. ही मिरवणूक लालबाग ते गिरगाव चौपाटी या आपल्या पारंपारिक मार्गाने मार्गक्रमण करेल, मुंबई गणेशोत्सवाच्या इतिहासात प्रथमच एक अभिमानास्पद सुवर्णपान जोडले जात आहे. लालबाग सार्वजनिक उत्सव मंडळाच्या वतीने, यंदा प्रथमच 22 फुटी भव्य 'मुंबईच्या राजा'चे विसर्जन गिरगाव चौपाटी येथे अत्याधुनिक बार्ज जहाजावरून थेट खोल समुद्रात करण्यात येणार आहे.मुंबईच्या गणेशोत्सवात असा प्रयोग पहिल्यांदाच होत असून, हा निर्णय ऐतिहासिक व पथदर्शी ठरणार आहे.

लातूरच्या जाऊ-खरोसा परिसरात मुख्यमंत्र्यांकडून पीक नुकसानीची पाहणी; सरसकट मदतीचे आश्वासन

सरकार शेतकऱ्यांना एकटे सोडणार नाही!

दुष्काळी दौऱ्यात मुख्यमंत्र्यांचा शब्द; वाळलेली पिके पाहून बळीराजाला हुंदका अनावर

जन सम्राट टाईम्स

लातूर । राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी लातूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी केली. निलंगा तालुक्यातील जाऊ आणि खरोसा येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांनी करपलेली पिके, कोरड्या विहिरी आणि पाण्याची परिस्थिती जाणून घेतली. संकटाच्या काळात सरकार शेतकऱ्यांना एकटे सोडणार नाही, तर पूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभे राहून आवश्यक ती मदत करेल, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली.

यंदा मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागांत पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. लातूर जिल्ह्यातील परिस्थिती विशेषतः चिंताजनक असल्याचे पाहणीदरम्यान समोर आले. नदी-नाले आणि विहिरींमध्ये पाणीसाठा कमी झाला असून, पुढील काही महिने पिण्याचे पाणी तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी धीर न सोडता संकटाचा सामना करण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. दुष्काळाचा सामना करण्यासाठी पिण्याचे पाणी,



जनावरांचा चारा, अन्नधान्य तसेच अन्य आवश्यक बाबींचे नियोजन करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. दुष्काळ निवारणासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नसल्याचेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. पीक नुकसानीचे पंचनामे ही प्रशासकीय प्रक्रिया असली तरी, त्यात अडकून न पडता बाधित शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्याची भूमिका सरकारने घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.अशी घोषणा त्यांनी केली होती. दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाने दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन पहिल्या टप्प्यात १५ जिल्ह्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला असून, केंद्र सरकारकडेही मदतीसाठी प्रस्ताव पाठविण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. केंद्राच्या मदतीची प्रतीक्षा न करता राज्य सरकारकडूनही शेतकऱ्यांना मदत केली जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

निलंगा तालुक्यातील जाऊ येथे पीक नुकसानीची माहिती देताना नूर पटेल हे शेतकरी भावूक झाले. डोळ्यांसमोर करपलेली पिके वाया गेल्याची व्यथा सांगताना त्यांना हुंदका अनावर झाला. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांचा हात हातात घेत धीर दिला. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची व्यथा प्रत्यक्ष बांधावर जाऊन समजून घेण्याचा प्रयत्न मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यात करण्यात आला. लातूरनंतर धाराशिव जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागाचीही त्यांनी पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. दरम्यान,कृषिपंप वीजबिलाबाबत सरकारने यापूर्वीच निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केलेदिलासा देण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांना मिळेपर्यंत तिची अंमलबजावणी सुरू ठेवण्याचेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्याच्या बांधावरून...

जाऊ आणि खरोसा गावांतील खरीप पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी. दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्याचे निर्देश. जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्यावर भर.
शेतकऱ्यांना अन्नधान्यासह आवश्यक मदत देण्याची तयारी.
जलसंधारण आणि रोजगारनिर्मितीची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्याचे संकेत. दुष्काळ निवारणासाठी निधीची कमतरता पडू न देण्याचे आश्वासन.

6 हजार कुटुंबांना मिळणार हक्काचे घर;रमाबाई नगर क्लस्टरचे शिंदें यांच्या हस्ते भूमिपूजन

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी: मुंबई-एमएमआरमध्ये पुढील १५ ते २० वर्षांत ३० लाख घरे बांधणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले. मुंबई ठाण्यासह मीरा-भाईंदर, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर आदी शहरांमध्ये क्लस्टरला चालना देण्याचे शासनाचे धोरण असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. युनिफाइड डीसीपीआरमधील बदलांमुळे क्लस्टर आणि एसआरए प्रकल्पांना गती मिळाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ठाणे महापालिकेच्या सिद्धेश्वर नगर आणि रमाबाई नगर क्लस्टर योजनेच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. ठाण्यातील ६ हजार कुटुंबांना सुरक्षित, दर्जेदार घरे देतानाच २३ नागरी सुविधा, रोजगाराच्या संधी आणि नियोजित टाऊनशिप उभारून नव्या ठाण्याचा पाया रचण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. सुमारे २० हेक्टर अर्थात ५० एकर परिसरात विकसित होणाऱ्या या क्लस्टरमध्ये अनेक सोयीसुविधा उपलब्ध होणार आहेत. निवासी इमारती नव्हे, तर मोठे रस्ते, मुबलक पाणी, सांडपाणी व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, गार्डन, मैदान, कम्युनिटी हॉल, जिम्नॅशियम, योगा सेंटर, इनडोअर गेम्स, डिजिटल लायब्ररी, डे-केअर सेंटर, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, महिला सक्षमीकरण केंद्र आणि स्मार्ट स्ट्रीट लाइटिंग अशा सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.'सिटी विथिन द सिटी' या संकल्पनेतून हा विकास होणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले. ठाण्यातील धोकादायक इमारतींच्या दुर्घटनांचा संदर्भ देत शिंदे यांनी क्लस्टरचा प्रवास २० वर्षांच्या संघर्षातून पुढे आल्याचे सांगितले.



किसनगरमधील साईराज इमारत दुर्घटनेसह अनेक दुर्घटनांनंतर धोकादायक इमारतींच्या प्रश्नावर उपोषण, मोर्चे आणि विधानसभेत सातत्याने आवाज उठवला. नगरविकास मंत्री आणि मुख्यमंत्री म्हणून धोरणात्मक अडथळे दूर करून क्लस्टर प्रत्यक्षात आणल्याचे त्यांनी नमूद केले. किसननगरमधील पहिल्या टप्प्याचे काम पूर्णत्वाकडे असून लवकरच रहिवाशांना घरांच्या चाव्या देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. क्लस्टरमध्ये निवासी बांधकामासोबत कमर्शियल विकास आणि स्थानिक रोजगार निर्माण करण्यावर शिंदे यांनी भर दिला. "घरातून उतरायचे आणि जवळच कामाला जायचे," या 'वॉक टू वर्क' संकल्पनेतून स्थानिक तरुणांना रोजगार मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सिद्धेश्वर तलाव परिसराचे पुनर्विकासासोबत स्वच्छता व सुशोभीकरण होऊन तलावाला मोकळा श्वास मिळेल, असेही ते म्हणाले. रहिवाशांच्या मागण्यांबाबत कॉर्पस फंड, अतिरिक्त १०० चौरस फुटांची जागा परवडणाऱ्या दरात देणे आणि छोट्या दुकानदारांच्या पुनर्वसनाचा विचार करण्याचे संकेत त्यांनी दिले. "दोन पैसे कमी नफा झाला तरी चालेल; नागरिकांच्या घरांच्या दर्जात कपात करू नका," अशी स्पष्ट सूचना विकासकांना करताना सरकार आणि महापालिकेकडून आवश्यक सहकार्य देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. मेट्रो, अंतर्गत मेट्रो, कोस्टल रोड आणि ठाणे-बोरिवली बोगदा यासारख्या प्रकल्पांमुळे ठाण्याच्या पायाभूत सुविधांना नवी दिशा मिळणार असल्याचे सांगत, क्लस्टरमधील इमारतीही दर्जेदार आणि वैशिष्ट्यपूर्ण असाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आयकॉनिक इमारतींसाठी प्रोत्साहनात्मक एफएसआयची तरतूद असल्याचेही त्यांनी सांगितले. "क्लस्टर म्हणजे केवळ घर नव्हे; चांगले घर, चांगल्या सुविधा, रोजगार आणि बदललेले जीवनमान," हा संदेश देत शिंदे यांनी हरिवंश राय बच्चन यांच्या 'कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती' या ओळींचा दाखला दिला. अखेरीस विकासकांनी नागरिकांना वेळेत घरे देतानाच चांगल्या सुविधांसोबत मोठा टीव्हीही भेट म्हणून द्यावा.

नागपूर विमानतळावर बोर्डिंग पास स्कॅनची गरज नाही!

जन सम्राट टाईम्स

नागपूर । प्रतिनिधी: ओळखताच क्षणार्धात होणार प्रवेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवाशांचा प्रवास अधिक वेगवान, सुलभ आणि डिजिटल करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. जीएमआर नागपूर इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडने विमानतळावर अत्याधुनिक 'सिंगल-स्टेप फेस रेकग्निशन' सुविधा सुरू केली आहे. या सुविधेमुळे डिजीयात्रा गेटवर प्रवेश करताना प्रवाशांना बोर्डिंग पास स्कॅन करण्याची आवश्यकता राहणार नाही. यापूर्वी डिजीयात्रा ॲपवर नोंदणी करून बोर्डिंग पास लिंक केल्यानंतर विमानतळाच्या प्रवेशद्वारावर प्रवाशांना प्रथम बोर्डिंग पास स्कॅन करावा लागत होता. त्यानंतर चेहऱ्याची पडताळणी झाल्यानंतर गेट उघडत असे. आता नव्या यंत्रणेमुळे ही प्रक्रिया आणखी सुलभ झाली आहे. प्रवाशाने डिजीयात्रा गेटसमोर उभे राहिल्यानंतर अत्याधुनिक फेस रेकग्निशन प्रणालीद्वारे त्याचा चेहरा ओळखला जाईल आणि पडताळणी पूर्ण होताच गेट आपोआप उघडेल. जीएमआर नागपूर इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत भांडारकर यांनी सांगितले की, नागपूर विमानतळावर प्रवाशांचा



प्रवास अधिक सुखकर आणि अडथळामुक्त करणे हे कंपनीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. 'सिंगल-स्टेप फेस रेकग्निशन'मुळे मानवी हस्तक्षेप कमी होण्यास मदत होणार असून, प्रवाशांना अधिक वेगवान सेवा उपलब्ध होईल. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी प्रवाशांनी आपल्या मोबाइलमध्ये 'डिजीयात्रा' ॲप डाउनलोड करून आवश्यक माहिती भरावी आणि चेहऱ्याचे ऑथेंटिकेशन पूर्ण करावे. प्रवासाच्या दिवशी ॲपमध्ये बोर्डिंग पास अपलोड करून प्रवासाची माहिती नागपूर विमानतळासोबत शेअर करणे आवश्यक आहे. विमानतळावर पोहोचल्यानंतर प्रवाशांनी डिजीयात्रा गेटसमोर केवळ उभे राहायचे आहे. फेस रेकग्निशन प्रणालीद्वारे चेहरा ओळखला जाताच काही क्षणांत गेट उघडेल. विमानतळावरील रांगा कमी करण्यासही मदत होण्याची अपेक्षा आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विमानतळावरील प्रवासी सेवा अधिक कार्यक्षम करण्याच्या प्रयत्नातील ही सुविधा महत्त्वाची मानली जात आहे. जीएमआर नागपूर इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडने विमानतळावर अत्याधुनिक 'सिंगल-स्टेप फेस रेकग्निशन' सुविधा सुरू केली आहे. या सुविधेमुळे डिजीयात्रा गेटवर प्रवेश करताना प्रवाशांना बोर्डिंग पास स्कॅन करण्याची आवश्यकता राहणार नाही.

प्रसिद्ध अभिनेत्याची मृत्यूशी झुंज

नवी दिल्ली: 'भाभीजी घर पर हैं' (Bhabiji Ghar Par Hain) आणि 'एफआयआर' (FIR) सारख्या टीव्ही सीरिअल्समधील (TV Serials) भूमिकांसाठी ओळखले जाणारे अभिनेते ईश्वर ठाकूर (Actor Ishwar Thakur) यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचं वृत्त समोर आलंय. 54 वर्षीय अभिनेता सध्या आयसीयू (ICU) मध्ये दाखल आहेत. अभिनेत्याची बहीण जयश्री यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या उपचारांसाठी कुटुंबाकडे आता पैसे उरलेले नाहीत आणि त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे, त्यामुळे त्यांनी मदतीसाठी आवाहन केलंय.यांच्या माहितीनुसार, दोन-तीन दिवसांपूर्वी ईश्वर यांची प्रकृती अचानक खालावली

लातूरसह राज्यातील 'या' जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट



जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली | प्रतिनिधी: सध्या वातावरणात कमालीचा बदल होताना दिसत आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. यामुळे देशातील काही राज्यांमध्ये मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. सिंधुदुर्ग, कोल्हापूर, कोल्हापूर घाट परिसर, सातारा घाट परिसर, छत्रपती संभाजीनगर, लातूरसह राज्यातील अनेक जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्यातील अनेक भागांत अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाला आहे. त्यात धाराशिव, लातूर, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये तर प्रचंड कमी पाऊस पडला आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. अशा परिस्थितीत हवामान विभागाकडून राज्यात पावसाचा इशारा देण्यात आल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, यवतमाळ या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

या काळात वाऱ्याचा वेग हा 40 ते 50 किमी प्रतितास वेगाने राहण्याची शक्यता आहे. तसेच या चारही जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.दरम्यान, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात 23 ते 26 सप्टेंबर या काळात पावसाची शक्यता आहे. या काळात काही ठिकाणी ढगांच्या गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. तसेच वाऱ्याचा वेग हा 40 ते 50 किंवा काही ठिकाणी 60 किमी प्रतितास वेगाने राहण्याची शक्यता आहे. सिंधुदुर्ग, जळगाव, कोल्हापूर, कोल्हापूर घाट परिसर, सातारा घाट परिसर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, गोंदिया, वर्धा, वाशिम या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यावेळी वाऱ्याचा वेग ताशी 40 ते 50 किमी प्रतितास राहण्याची शक्यता आहे.कोकण आणि गोव्यात २२ ते २७ सप्टेंबरदरम्यान पावसाची शक्यता आहे. कोकण-गोवा आणि मध्य महाराष्ट्रात २१ ते २४ सप्टेंबरदरम्यान, तर मराठवाड्यात २१ ते २३ सप्टेंबरदरम्यान काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस आणि विजांचा कडकडाट होण्याचा अंदाजही व्यक्त करण्यात आला होता. सध्या वातावरणात कमालीचा बदल होताना दिसत आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. यामुळे देशातील काही राज्यांमध्ये मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. सिंधुदुर्ग, कोल्हापूर, कोल्हापूर घाट परिसर, सातारा घाट परिसर, छत्रपती संभाजीनगर, लातूरसह राज्यातील अनेक जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्यातील अनेक भागांत अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाला आहे. त्यात धाराशिव, लातूर, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये तर प्रचंड कमी पाऊस पडला आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

आंदोलनाच्या धास्तीनेच घाईघाईत आचारसंहिता लावली

रोहित पवारांचा निवडणूक आयोगावर हल्लाबोल; मराठवाड्यातील दुष्काळप्रश्नी बीडमध्ये आंदोलनाची हाक

जन सम्राट टाईम्स

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी: मराठवाड्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सरकार आणि निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, तातडीने पंचनामे करून मदत जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर संबंधित मतदारसंघांत आचारसंहिता लागू झाली आहे. मतदान २३ ऑक्टोबरला, तर मतमोजणी २७ ऑक्टोबरला होणार आहे. रोहित पवार यांनी मराठवाड्यातील सर्व जिल्हाध्यक्षांसह विभागीय आयुक्तांची भेट घेत दुष्काळी परिस्थितीची माहिती दिली. शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून नुकसानीची आकडेवारी संकलित केल्याचा दावा त्यांनी केला. संपूर्ण मराठवाड्यात शेतकऱ्यांचे सुमारे ३५ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा पवार यांनी केला आहे. यापूर्वीही त्यांनी मराठवाड्यातील नुकसानीचा अंदाज ३५ हजार कोटी रुपये असल्याचे सांगितले होते. विभागीय आयुक्तांकडे नुकसानीची आकडेवारी सादर करून तातडीने पंचनामे करण्याची मागणी केल्याचे पवार यांनी सांगितले. शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर ५० हजार रुपयांची मदत द्यावी तसेच पशुधनासाठी तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी त्यांची मागणी



आहे. दुष्काळाबाबत सरकारने ठोस निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले.

पीक विमा कंपन्यांवरही आरोप

पीक विमा कंपन्यांच्या कारभारावरही रोहित पवार यांनी प्रश्न उपस्थित केले. पीक कापणीच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचा आरोप त्यांनी केला. बीड जिल्ह्यातील सुमारे ८०० कोटी रुपये आणि धाराशिव जिल्ह्यातील २०२२ सालातील सुमारे ६०० कोटी रुपयांच्या पीक विम्याच्या रकमेकडे त्यांनी लक्ष वेधले. या दाव्यांची स्वतंत्र अधिकृत पडताळणी या वृत्तातून झालेली नाही. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या भूमिकेवरही पवार यांनी टीका केली. मंत्र्यांकडे अधिकार नसतील आणि सर्व निर्णय मुख्यमंत्र्यांकडे केंद्रीत असतील, तर मंत्र्यांनी पाहणी करण्याचे कारण काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. दुष्काळी परिस्थितीत मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सरकारवर दबाव आणावा, असेही पवार म्हणाले. 'आचारसंहितेमागे आंदोलनाची धास्ती'

विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेवर बोलताना रोहित पवार यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले. पुण्यात नियोजित विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू करण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, आंदोलन दडपण्यासाठी निवडणूक जाहीर करण्याची घाई करण्यात आली. मात्र, निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील पाच विधान परिषद जागांसाठी नियमित द्वैवार्षिक निवडणूक प्रक्रिया जाहीर केली आहे.

२९ सप्टेंबरला अधिसूचना, ६ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज, ७ ऑक्टोबरला छाननी आणि ९ ऑक्टोबरपर्यंत माघार अशी प्रक्रिया आहे. दरम्यान, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार, असा इशारा रोहित पवार यांनी दिला असून, बीड जिल्ह्यात आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे दुष्काळाचा प्रश्न आणि आगामी विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता यावरून राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता आहे

मराठवाड्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सरकार आणि निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे.

अटकेची लेखी कारणे दिली नाहीत तर पोलीस अधिकाऱ्यावर विभागीय चौकशी

सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय; अनुच्छेद २२(१)च्या संरक्षणाचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी : एखाद्या व्यक्तीला अटक करताना अटकेची कारणे लेखी स्वरूपात आणि अटक केलेल्या व्यक्तीला समजेल अशा भाषेत देणे आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. अटकेची कारणे लेखी स्वरूपात न दिल्यास संबंधित अटक घटनात्मक संरक्षणाचे उल्लंघन ठरू शकते आणि अशा प्रकरणात संबंधित पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशीचा विचार केला जावा, असे महत्त्वपूर्ण निर्देश न्यायालयाने दिले आहेत. हा निर्णय २१ सप्टेंबर २०२६ रोजी न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान आणि न्यायमूर्ती अतुल एस. चंदुरकर यांच्या खंडपीठाने दिला. लेखी कारणे देणे घटनात्मक संरक्षण राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(१)नुसार अटक केलेल्या व्यक्तीला अटकेची कारणे शक्य तितक्या लवकर कळविण्याचा अधिकार आहे. सर्वोच्च न्यायालयाने या संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना अटकेची कारणे केवळ औपचारिकरीत्या नव्हे, तर संबंधित व्यक्तीला समजेल अशा पद्धतीने उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. अटकेची कारणे लेखी स्वरूपात न देणे ही केवळ प्रक्रियात्मक त्रुटी नसून घटनात्मक अधिकाराशी संबंधित बाब असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या अटकेची न्यायालयीन तपासणी होऊ शकते. बेकायदेशीर अटकेनंतर थेट पुन्हा अटक नाही एखाद्या व्यक्तीची सुरुवातीची अटक घटनात्मक संरक्षणाचे उल्लंघन झाल्यामुळे बेकायदेशीर ठरवून त्याची सुटका झाली, तर तपास यंत्रणेला त्याच प्रकरणात त्या व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार तातडीने पुन्हा अटक करता येणार नाही. पुन्हा अटक करण्याची आवश्यकता असल्यास त्यासाठी न्यायालयीन प्रक्रियेचे पालन आणि सक्षम



दंडाधिकाऱ्याची मंजुरी आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. आरोपपत्रामुळे बेकायदेशीर अटकेला वैधता नाही अटकेच्या वेळी आवश्यक घटनात्मक प्रक्रिया पाळली गेली नाही, तर त्यानंतर आरोपपत्र दाखल करणे किंवा न्यायालयीन दखल घेतली जाणे यामुळे आधीची बेकायदेशीर अटक आपोआप कायदेशीर ठरत नाही, असा न्यायालयीन दृष्टिकोन या निर्णयातून अधोरेखित झाला आहे. अनुच्छेद २२(१)मधील संरक्षण हे केवळ औपचारिकता नसून अटक झालेल्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करणारे घटनात्मक कवच आहे. त्यामुळे तपास यंत्रणांनी अटकेची प्रक्रिया काटेकोरपणे पार पाडणे आवश्यक आहे. पोलिस अधिकाऱ्यांच्या जबाबदारीवरही भर अटकेची कारणे लेखी स्वरूपात न देण्यासारख्या उल्लंघनाची गंभीर दखल घेत संबंधित पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशीची प्रक्रिया सुरू करण्याच्या मुद्द्यावरही सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. या निर्णयाची प्रत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलीस महासंचालकांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती उपलब्ध आहे. २४ तासांत न्यायालयासमोर हजर करणे बंधनकारक अटक केलेल्या व्यक्तीला २४ तासांच्या आत सक्षम न्यायालयासमोर हजर करण्याचे घटनात्मक संरक्षणही या संदर्भात महत्त्वाचे आहे. अटक, अटकेची कारणे सांगणे आणि न्यायालयासमोर हजर करणे या सर्व प्रक्रियांमध्ये घटनात्मक हमीचे पालन करणे आवश्यक असल्याचे न्यायालयीन भूमिकेतून स्पष्ट होते. या निर्णयामुळे अटक प्रक्रियेत पारदर्शकता, पोलिसांची जबाबदारी आणि नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणाबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळाले आहे. एखाद्या व्यक्तीला अटक करताना अटकेची कारणे लेखी स्वरूपात आणि अटक केलेल्या व्यक्तीला समजेल अशा भाषेत देणे आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. अटकेची कारणे लेखी स्वरूपात न दिल्यास संबंधित अटक घटनात्मक संरक्षणाचे उल्लंघन ठरू शकते आणि अशा प्रकरणात संबंधित पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशीचा विचार केला जावा, असे महत्त्वपूर्ण निर्देश न्यायालयाने दिले आहेत. हा निर्णय २१ सप्टेंबर २०२६ रोजी न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान आणि न्यायमूर्ती अतुल एस. चंदुरकर यांच्या खंडपीठाने दिला. लेखी कारणे देणे घटनात्मक संरक्षण राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(१)नुसार अटक केलेल्या व्यक्तीला अटकेची कारणे शक्य तितक्या लवकर कळविण्याचा अधिकार आहे. सर्वोच्च न्यायालयाने या संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना अटकेची कारणे केवळ औपचारिकरीत्या नव्हे, तर संबंधित व्यक्तीला समजेल अशा पद्धतीने उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. अटकेची कारणे लेखी स्वरूपात न देणे ही केवळ प्रक्रियात्मक त्रुटी नसून घटनात्मक अधिकाराशी संबंधित बाब असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयीन तपासणी होऊ शकते. बेकायदेशीर अटकेनंतर थेट पुन्हा अटक नाही एखाद्या व्यक्तीची सुरुवातीची अटक घटनात्मक संरक्षणाचे उल्लंघन झाल्यामुळे बेकायदेशीर ठरवून त्याची सुटका झाली, तर तपास यंत्रणेला त्याच प्रकरणात त्या व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार तातडीने पुन्हा अटक करता येणार नाही. पुन्हा अटक करण्याची आवश्यकता असल्यास त्यासाठी न्यायालयीन प्रक्रियेचे पालन आणि सक्षम दंडाधिकाऱ्याची मंजुरी आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. आरोपपत्रामुळे बेकायदेशीर अटकेला वैधता नाही अटकेच्या वेळी आवश्यक घटनात्मक प्रक्रिया पाळली गेली नाही, तर त्यानंतर आरोपपत्र दाखल करणे किंवा न्यायालयीन दखल घेतली जाणे यामुळे आधीची बेकायदेशीर अटक आपोआप कायदेशीर ठरत नाही, असा न्यायालयीन दृष्टिकोन या निर्णयातून अधोरेखित झाला आहे. अनुच्छेद २२(१)मधील संरक्षण हे केवळ औपचारिकता नसून अटक झालेल्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करणारे घटनात्मक कवच आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

अंथरुणातून गायब झालेली आठ महिन्यांची चिमुकली अखेर सापडली!

जन सम्राट टाईम्स

नांदगाव| प्रतिनिधी नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील मन्याड चौकी परिसरातून १७ सप्टेंबरच्या मध्यरात्री आई-वडिलांच्या शेजारी झोपलेल्या अवघ्या आठ महिन्यांच्या चिमुकलीच्या बेपत्ता होण्याने मोठी खळबळ उडाली होती. अपहरणाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू केली. अखेर तब्बल तीन दिवसांनी ही चिमुकली येवला तालुक्यातील वाईबोथी गावात एका शेताच्या कडेला बेवारस अवस्थेत आढळून आली. चिमुकली सुखरूप असल्याने कुटुंबीयांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. मिळालेल्या माहितीनुसार, १७ सप्टेंबरच्या रात्री चिमुकली नेहमीप्रमाणे आई-वडिलांच्या शेजारी झोपली होती. मध्यरात्रीच्या सुमारास ती अंथरुणातून गायब झाल्याचे कुटुंबीयांच्या लक्षात आले. घरात शोध घेतल्यानंतरही चिमुकलीचा ठावठिकाणा न लागल्याने नांदगाव पोलीस ठाण्यात अपहरणाची तक्रार दाखल करण्यात आली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नांदगाव पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. परिसरातील वाड्या-वस्त्या, शेतजमिनी, संभाव्य ठिकाणे तसेच नातेवाईकांकडे शोध घेण्यात आला. शोधमोहीमेसाठी श्वानपथक व अन्य तज्ज्ञांचीही मदत घेण्यात आली.

दरम्यान, रविवारी सकाळी येवला तालुक्यातील वाईबोथी येथे एका शेताच्या कडेला शेतमजुरांना चिमुकली आढळून आली. त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिल्यानंतर येवला पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बालिकेला ताब्यात घेतले. वैद्यकीय तपासणीनंतर ती सुखरूप असल्याचे स्पष्ट झाले आणि आवश्यक कायदेशीर प्रक्रिया



पूर्ण करून तिला आई-वडिलांच्या स्वाधीन करण्यात आले. या प्रकरणाला तपासादरम्यान आणखी एक धक्कादायक वळण मिळाले. एका व्यक्तीची संशयित म्हणून चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर संबंधित व्यक्तीने आत्महत्या केल्याचे वृत्त समोर आले. या घटनेमुळे प्रकरणाचे गूढ अधिकच वाढले होते. पोलिसांकडून या सर्व बाबींचा तपास केला जात आहे. मात्र अवघ्या आठ महिन्यांची चिमुकली नांदगावहून सुमारे ३० किलोमीटर अंतरावरील वाईबोथीपर्यंत कशी पोहोचली, तिला तेथे कोणी आणून सोडले आणि या घटनेमागे नेमके कोण आहे, याची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत. त्यामुळे चिमुकली सुखरूप सापडली असली तरी या प्रकरणाचे संपूर्ण गूढ उकलण्याचे आव्हान पोलिसांसमोर कायम आहे. नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील मन्याड चौकी परिसरातून १७ सप्टेंबरच्या मध्यरात्री आई-वडिलांच्या शेजारी झोपलेल्या अवघ्या आठ महिन्यांच्या चिमुकलीच्या बेपत्ता होण्याने मोठी खळबळ उडाली होती. अपहरणाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू केली.

अखेर तब्बल तीन दिवसांनी ही चिमुकली येवला तालुक्यातील वाईबोथी गावात एका शेताच्या कडेला बेवारस अवस्थेत आढळून आली. चिमुकली सुखरूप असल्याने कुटुंबीयांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

साकरे शिवारात वीज कोसळून १६ बकऱ्या ठार मजूर थोडक्यात बचावले!

जन सम्राट टाईम्स

धरणगाव | प्रतिनिधी: धरणगाव तालुक्यातील साकरे शिवारात बुधवारी (दि. २३) सायंकाळी पाचच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह अचानक आलेल्या पावसादरम्यान वीज कोसळून १६ बकऱ्या जागीच ठार झाल्याची घटना घडली. या घटनेत बकऱ्या चारण्यासाठी गेलेले मजूर सुदैवाने थोडक्यात बचावले. घटनेमुळे पीडित मजूरांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. वीज कोसळल्याची माहिती मिळताच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते गुलाबराव वाघ आणि तालुकाप्रमुख जयदीप पाटील यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. घटनेची माहिती त्यांनी धरणगावचे तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांना दिली.

मृत बकऱ्यांचा तातडीने पंचनामा करून पीडित मजूरांना शासनाकडून नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी त्यांनी केली. मजुरांचे मोठे नुकसान आबा पाटील, गोकुळ पाटील,



नारायण पारधी, भगवान पारधी आणि जामलाल पारधी यांच्या मालकीच्या बकऱ्या वीज कोसळल्याने ठार झाल्या. बकऱ्यांवरच कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याने या घटनेमुळे संबंधित मजूर कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे. दरम्यान, धरणगावचे पशुवैद्यकीय अधिकारी गौरव सूर्यवंशी यांनी घटनास्थळी भेट देऊन मृत बकऱ्यांचा पंचनामा केला. शासनाच्या नियमानुसार नुकसानभरपाई मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या वेळी राष्ट्रवादीचे मोहन पाटील सर, भाऊसाहेब पाटील, दिनेश भदाणे, तलाठी संदेश महाजन, पोलीस पाटील घनश्याम पाटील, कोतवाल शितल कुमार पवार, किशोर पाटील तसेच शिवसेनेचे मीडिया प्रमुख गजानन महाजन उपस्थित होते.धरणगाव तालुक्यातील साकरे शिवारात बुधवारी (दि. २३) सायंकाळी पाचच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह अचानक आलेल्या पावसादरम्यान वीज कोसळून १६ बकऱ्या जागीच ठार झाल्याची घटना घडली. या घटनेत बकऱ्या चारण्यासाठी गेलेले मजूर सुदैवाने थोडक्यात बचावले. घटनेमुळे पीडित मजूरांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

५१०० नारळांपासून साकारली १८ फूट उंच गणरायाची भव्य मूर्ती!

जय श्री राम' बहुउद्देशीय संस्थेच्या गणेश मंडळाचा उपक्रम

जन सम्राट टाईम्स

जळगाव : । प्रतिनिधी: पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत जळगाव शहरातील लक्ष्मीनगर येथील 'जय श्री राम' बहुउद्देशीय संस्था, गणेश मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त अनोखा आणि भव्य उपक्रम साकारला आहे. तब्बल ५ हजार १०० नारळांचा वापर करून १८ फूट उंच गणरायाची पर्यावरणपूरक मूर्ती तयार करण्यात आली आहे. नारळांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेतून साकारलेले हे गणरायाचे भव्य रूप नागरिकांचे आणि भाविकांचे लक्ष वेधून घेत असून, ही आकर्षक आरास पाहण्यासाठी परिसरात भाविकांची मोठी गर्दी होत आहे. या वैशिष्ट्यपूर्ण गणेशमूर्तीच्या निर्मितीसाठी तरसोद येथील प्रसिद्ध गणपती मंदिर, इच्छादेवी गणपती मंदिर, भवानीमाता मंदिर तसेच परिसरातील भाविक भक्तांनी श्रद्धेने नारळ जमा करून दिले. भाविकांच्या सहभागातून जमा झालेल्या हजारो नारळांचा कलात्मक वापर



करून गणरायाची ही भव्य मूर्ती साकारण्यात आली आहे. ही विशाल आणि नयनरम्य मूर्ती पूर्ण करण्यासाठी भरत भाऊ बाविस्कर, श्रवण खेडकर आणि ओम मिस्तरी यांनी तब्बल १८ दिवस अहोरात्र मेहनत घेतली. त्यांच्या कल्पकतेला आणि मेहनतीला भाविकांच्या सहभागाची जोड मिळाल्याने नारळांपासून साकारलेली ही मूर्ती गणेशोत्सवाचे विशेष आकर्षण ठरली आहे. नारळांची आकर्षक मांडणी, मूर्तीचेभव्य स्वरूप आणि पर्यावरणपूरक संकल्पना यामुळे या उपक्रमाचे परिसरातील नागरिक व भाविकांकडून भरभरून कौतुक होत आहे. पारंपरिक भक्तिला पर्यावरण संवर्धनाची जोड देत मंडळाने गणेशोत्सवाच्या माध्यमातून 'भक्तीही आणि पर्यावरणाची जपणूकही' असा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. याबाबत मंडळाचे अध्यक्ष भरत भाऊ बाविस्कर व उपाध्यक्ष उल्हास चव्हाण यांनी माहिती देताना सांगितले की, गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक आणि पर्यावरणपूरक संदेश देण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे. भाविकांनी श्रद्धेने दिलेल्या नारळांचा विधायक व कलात्मक वापर करून गणरायाची ही भव्य मूर्ती साकारण्यात आली आहे. ५१०० नारळ... १८ फूट उंची... १८ दिवसांची मेहनत आणि भक्तीचा अनोखा आविष्कार! त्यामुळे लक्ष्मीनगरमधील हा पर्यावरणपूरक गणराय यंदाच्या गणेशोत्सवातील विशेष आकर्षण ठरत आहे. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत जळगाव शहरातील लक्ष्मीनगर येथील 'जय श्री राम' बहुउद्देशीय संस्था, गणेश मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त अनोखा आणि भव्य उपक्रम साकारला आहे. तब्बल ५ हजार १०० नारळांचा वापर करून १८ फूट उंच गणरायाची पर्यावरणपूरक मूर्ती तयार करण्यात आली आहे.

दापोऱ्यात भक्तिरसाचा जागर!

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: दापोरा, ता. जि. जळगाव : दापोरा नगरीत भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिक प्रबोधनाचा सुरेल संगम अनुभवायला मिळणार आहे. स्व. ह.भ.प. नथ्थु ओंकार सोनवणे (आण्णासाहेब) यांच्या पाचव्या पुण्यस्मरणार्थ भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ८ ते १० वाजेपर्यंत हा भक्तिमय सोहळा पार पडणार आहे. या विशेष कीर्तन सोहळ्यात ह.भ.प. जितेंद्र महाराज पंडित, सोयगावकर, जि. संभाजीनगर हे आपल्या प्रभावी वाणीने कीर्तनसेवा बजावणार आहेत. त्यांच्या रसाळ आणि ओघवत्या कीर्तनातून संतपरंपरा, अध्यात्मिक विचार तसेच समाजप्रबोधनाचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचणार आहे. त्यामुळे दापोरा नगरीत भक्तिरसाची अनुभूती घेण्याची संधी भाविकांना मिळणार आहे. स्व. नथ्थु ओंकार सोनवणे (आण्णासाहेब) यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याच्या माध्यमातून त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यासोबतच भक्ती, अध्यात्म आणि संतविचारांचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन श्री. नरेंद्र नथ्थू सोनवणे, श्री. महेंद्र नथ्थू सोनवणे, श्री. शुभम नरेंद्र सोनवणे, तेजस महेंद्र सोनवणे आणि हर्षित महेंद्र सोनवणे यांच्या सहभागातून करण्यात आले आहे. तसेच विठ्ठल-रुक्मिणी भजनी मंडळ, दापोरा यांचे सहकार्य लाभणार आहे. भाविकांना उपस्थितीचे आवाहन या भक्तिमय कीर्तन सोहळ्यास दापोरा तसेच परिसरातील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तनसेवा, भक्तिरस आणि आध्यात्मिक प्रबोधनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. स्थळ : दापोरा, ता. जि. जळगाव दिनांक : गुरुवार, १ ऑक्टोबर २०२६ वेळ : रात्री ८ ते १० वाजता भक्ती... श्रद्धा... प्रबोधन... आणि संतवाणीचा सुरेल संगम!

अशोक खरातच्या न्यायालयीन कोठडीत वाढ



जन सम्राट टाईम्स

नाशिक| प्रतिनिधी: दैवी शक्ती आणि भविष्यवाणीच्या नावाखाली महिलांवर लैंगिक अत्याचार तसेच आर्थिक फसवणूक केल्याच्या आरोपांप्रकरणी चर्चेत असलेले अशोककुमार एकनाथ उर्फ 'कॅप्टन' खरात याच्या मनी लाँड्रिंग प्रकरणात न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडी वाढवली आहे. त्याचवेळी त्याची पत्नी कल्पना अशोक खरात हिला विशेष न्यायालयाने सशर्त जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० सप्टेंबरला होणार असल्याचे वृत्त आहे. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) अशोक खरात, त्याची पत्नी कल्पना खरात आणि अन्य चार जणांविरुद्ध मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई केली आहे. ईडीने जुलै २०२६ मध्ये विशेष पीएमएलए न्यायालयात अभियोजन तक्रार दाखल केली होती. ईडीच्या माहितीनुसार, या प्रकरणात आतापर्यंत सुमारे ३६.९० कोटी रुपयांच्या मालमत्ता कुर्क, जप्त किंवा गोठवण्यात आल्या आहेत. २२ सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीवेळी अशोक खरात याला नाशिकरोड कारागृहातून व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याच्या न्यायालयीन कोठडीत वाढ केली. दरम्यान, कल्पना खरात न्यायालयात प्रत्यक्ष हजर झाली होती. तिने जामिनासाठी अर्ज केल्यानंतर न्यायालयाने तिला एक लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर सशर्त जामीन मंजूर केला. जामिनाच्या अटींनुसार कल्पना खरातला न्यायालयाच्या परवानगीशिवाय परदेशात जाता येणार नाही. तसेच खटल्यातील पुराव्यांशी छेडछाड करू नये, साक्षीदारांवर दबाव आणू नये, प्रत्येक सुनावणीला उपस्थित राहावे आणि ईडीने चौकशीसाठी बोलावल्यास तपास अधिकाऱ्यांसमोर हजर राहावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. तातडीने जामीनदार उपलब्ध न झाल्यास एक लाख रुपये तात्पुरते जमा करून सुटका करण्याची मुभाही देण्यात आली असून, एका महिन्याच्या आत जामीनदार सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ईडीच्या आरोपपत्रानुसार या प्रकरणात आर्थिक व्यवहारांबाबत विविध गंभीर दावे करण्यात आले आहेत.

बनावट दारू बनवण्याचा प्लॅन उध्वस्त! 1,250 लिटर स्पिरिटसह लाखोंचा मुद्देमाल जप्त;

वाहनांसह दोघांना अटक, आझादनगर स्पिरिटची वाहतूक पोलिसांची कारवाई

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी : बनावट दारू तयार करण्यासाठी स्पिरिटची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर आझादनगर पोलिसांनी कारवाई करत १,२५० लिटर स्पिरिटसह दोन संशयितांना वाहनांसह ताब्यात घेतले. पांजरा नदीलगत असलेल्या एका पत्र्याच्या शेडवर छापा टाकून करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी सुमारे ३ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

आझादनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी पांजरा नदीलगतच्या परिसरात कारवाईचे नियोजन केले. त्यानुसार पोलिस पथकाने संबंधित पत्र्याच्या शेडवर छापा टाकला. यावेळी स्पिरिटची वाहतूक करत असल्याच्या संशयावरून विनोद बन्सीलाल फुलपगारे (वय ४७, रा. भोई गल्ली, जुने धुळे) आणि जितेंद्र सेवाराम टेकवाणी (वय ४७, रा. कुमारनगर, साक्री रोड, धुळे) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी केलेल्या कारवाईत १,२५० लिटर स्पिरिट तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली वाहने जप्त करण्यात आली. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे ३ लाख ७५ हजार रुपये असल्याची



माहिती पोलिसांनी दिली आहे. महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा या प्रकरणी दोन्ही संशयितांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमातील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्पिरिटचा वापर नेमका कोणत्या कारणासाठी केला जाणार होता.

त्यामागे आणखी कोणी सहभागी आहे का, तसेच बनावट दारू निर्मितीशी या प्रकरणाचा संबंध आहे का, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. या कारवाईमुळे बनावट दारू निर्मितीचा संभाव्य प्रकार उघडकीस आला असून, पोलिसांच्या तपासात या प्रकरणामागील संपूर्ण साखळी समोर येण्याची शक्यता आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार उपासे यांच्या मार्गदर्शनाखाली आझादनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. कारवाईच्या पथकात पोलीस अंमलदार तुषार जाधव, गौतम सपकाळे, विनोद सरदार, योगेश शिरसाट, संदीप कडरे, शांतीलाल सोनवणे, मनोज बागुल, मकसूद पठाण आणि पंकज जोंधळे यांचा समावेश होता.

पुढील तपास आझादनगर पोलिसांकडून सुरू आहे.बनावट दारू तयार करण्यासाठी स्पिरिटची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर आझादनगर पोलिसांनी कारवाई करत १,२५० लिटर स्पिरिटसह दोन संशयितांना वाहनांसह ताब्यात घेतले. पांजरा नदीलगत असलेल्या एका पत्र्याच्या शेडवर छापा टाकून करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी सुमारे ३ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

भुसावळ तालुकास्तरीय शालेय खो-खो व हॉलीबॉल स्पर्धा उत्साह!

तब्बल ४४ संघांचा सहभाग; चुरशीच्या लढतींमध्ये खेळाडूंचे उत्कृष्ट प्रदर्शन

जन सम्राट टाईम्स

भुसावळ। प्रतिनिधी: सेवा पंधरवड्यानिमित्त महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जळगाव, पंचायत समिती शिक्षण विभाग, नगरपरिषद भुसावळ आणि म्युनिसिपल हायस्कूल, भुसावळ यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय शालेय मुलींच्या खो-खो व मुलांच्या हॉलीबॉल स्पर्धांचे आयोजन बियाणी मिलिटरी स्कूल, भुसावळ येथे करण्यात आले. विविध शाळांमधील तब्बल ४४ संघांनी सहभाग घेतल्याने स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बियाणी एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष मनोज बियाणी अध्यक्षस्थानी होते. नगरपरिषदेचे उपमुख्य अधिकारी शेख परवेज यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संगीता बियाणी, वैभव पवार, म्युनिसिपल हायस्कूलचे मुख्याध्यापक व्ही. पी. सुलताने, बियाणी स्कूलचे प्राचार्य डी. एम. पाटील, मुख्याध्यापिका अपर्णा राजपूत, महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष डॉ. प्रदीप साखरे, शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष मुकेश मोरे, विलास पाटील, हिम्मत पाटील यांच्यासह तालुक्यातील क्रीडा शिक्षक, खेळाडू व क्रीडाप्रेमी उपस्थित होते. खो-खोमध्ये सुनसगावच्या संघांची दमदार कामगिरी मुलींच्या १४ वर्षे वयोगटातील खो-खो स्पर्धेत दादासाहेब दामू पांडू पाटील विद्यालय, सुनसगाव संघाने विजेतेपद पटकावले, तर महात्मा गांधी विद्यालय संघ उपविजेता ठरला. १७ वर्षे वयोगटातही दादासाहेब दामू पांडू पाटील विद्यालयाने विजेतेपद मिळविले. माध्यमिक विद्यालय, ओझरखेडा संघाने उपविजेतेपद



पटकावले. १९ वर्षे वयोगटात गंगाधर सांडू चौधरी विद्यालयाचा संघ विजेता ठरला, तर महात्मा गांधी विद्यालयाचा संघ उपविजेता राहिला. १९ वर्षे वयोगटातील अन्य सामन्यात महात्मा गांधी विद्यालय, वरणगाव संघाने प्रथम क्रमांक मिळविला, तर अलहिरा उर्दू स्कूल, भुसावळ संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. हॉलीबॉलमध्ये महात्मा गांधी विद्यालयाची बाजी मुलांच्या १४ वर्षे वयोगटातील हॉलीबॉल स्पर्धेत ताप्ती पब्लिक स्कूल संघाने प्रथम क्रमांक मिळविला, तर बियाणी पब्लिक स्कूल, भुसावळ संघ द्वितीय ठरला. १७ वर्षे वयोगटात के. नारखेडे विद्यालय संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर पंडित नेहरू विद्यालय, वराडसीम संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. १९ वर्षे वयोगटात महात्मा गांधी विद्यालयाचा संघ विजेता ठरला, तर बियाणी पब्लिक स्कूल संघाने उपविजेतेपद मिळविले. क्रीडा शिक्षकांनी पंच म्हणून सांभाळली जबाबदारी स्पर्धेतील पंच म्हणून डॉ. प्रदीप साखरे यांच्या मार्गदर्शनाखाली विलास पाटील, हिम्मत पाटील, विजय संकट, मुकेश मोरे, उमेश राठोड, नामदेव चव्हाण, निलेश राजपूत, दत्तू अहिरे, लक्ष्मीकांत नेमाडे, सुनील चौधरी, योगेश खिर्डीकर, गणेश बोदडे, वंदना ठोके आणि अर्चना राजपूत आदी क्रीडा शिक्षकांनी जबाबदारी पार पाडली. विविध वयोगटातील खेळाडूंनी मैदानावर कौशल्य, चपळाई आणि संघभावनेचे दर्शन घडवत चुरशीच्या लढती दिल्या. प्रत्येक सामन्यात विजयासाठी खेळाडूंनी केलेल्या प्रयत्नांमुळे मैदानावर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी तालुक्यातील सर्व क्रीडा शिक्षक तसेच बियाणी मिलिटरी स्कूल, भुसावळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपले क्रीडा कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळाली असून, क्रीडा क्षेत्रातील नवोदित खेळाडूंना पुढील स्तरावरील स्पर्धांसाठी प्रेरणा मिळाली. सेवा पंधरवड्यानिमित्त महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जळगाव, पंचायत समिती शिक्षण विभाग, नगरपरिषद भुसावळ आणि म्युनिसिपल हायस्कूल, भुसावळ यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय शालेय मुलींच्या खो-खो व मुलांच्या हॉलीबॉल स्पर्धांचे आयोजन बियाणी मिलिटरी स्कूल, भुसावळ येथे करण्यात आले. विविध शाळांमधील तब्बल ४४ संघांनी सहभाग घेतल्याने स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बियाणी एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष मनोज बियाणी अध्यक्षस्थानी होते. नगरपरिषदेचे उपमुख्य अधिकारी शेख परवेज यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संगीता बियाणी, वैभव पवार, म्युनिसिपल हायस्कूलचे मुख्याध्यापक व्ही. पी. सुलताने, बियाणी स्कूलचे प्राचार्य डी. एम. पाटील, मुख्याध्यापिका अपर्णा राजपूत, महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष डॉ. प्रदीप साखरे, शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष मुकेश मोरे, विलास पाटील, हिम्मत पाटील यांच्यासह तालुक्यातील क्रीडा शिक्षक, खेळाडू व क्रीडाप्रेमी उपस्थित होते. खो-खोमध्ये सुनसगावच्या संघांची दमदार कामगिरी मुलींच्या १४ वर्षे वयोगटातील खो-खो स्पर्धेत दादासाहेब दामू पांडू पाटील विद्यालय, सुनसगाव संघाने विजेतेपद पटकावले, तर महात्मा गांधी विद्यालय संघ उपविजेता ठरला. १७ वर्षे वयोगटातील दादासाहेब दामू पांडू पाटील विद्यालयाने विजेतेपद मिळविले. माध्यमिक विद्यालय, ओझरखेडा संघाने उपविजेतेपद पटकावले. १९ वर्षे वयोगटात गंगाधर सांडू चौधरी विद्यालयाचा संघ विजेता ठरला, तर महात्मा गांधी विद्यालयाचा संघ उपविजेता राहिला. १९ वर्षे वयोगटातील अन्य सामन्यात महात्मा गांधी विद्यालय, वरणगाव संघाने प्रथम क्रमांक मिळविला, तर अलहिरा उर्दू स्कूल, भुसावळ संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

खिर्डी घरफोडी प्रकरणातील पाच आरोपी पोलिसांच्या ताब्यात!



जन सम्राट टाईम्स

निभोरा | प्रतिनिधी भडगाव रावेर तालुक्यातील खिर्डी येथे १४ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणण्यात निभोरा पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणात पाच संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून चोरीला गेलेल्या सोने-चांदीच्या दागिन्यांसह इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. खिर्डी येथील घरफोडीच्या घटनेत तब्बल ६ लाख १६ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला होता. याप्रकरणी निभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्या
त आला होता. गुन्ह्याचा तपास करताना रावेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी (DySP) अनिल बडबुजर, निभोरा पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी मीना देशमुख आणि त्यांच्या पथकाने गोपनीय माहिती तसेच विशेष तपास यंत्रणेच्या आधारे तपासाची चक्रे फिरवली. तपासादरम्यान पोलिसांनी पाच संशयित आरोपींना ताब्यात घेतले.

पोलिसांच्या माहितीनुसार, त्यांच्याकडून ५ लाख ८९ हजार ३१० रुपयांचे सोने-चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे खिर्डी येथील घरफोडीचा तपास महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. आणखी दोन घरफोड्यांची उकल पोलिसांनी तपास अधिक गतिमान केल्यानंतर ताब्यातील आरोपींकडून आणखी दोन घरफोड्यांबाबत माहिती मिळाल्याचे पोलिसांनी सांगितले. या गुन्ह्यांशी संबंधित १ लाख ७२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल तसेच ३७ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आल्याची माहिती आहे. या कारवाईमुळे परिसरातील घरफोडीच्या घटनांच्या तपासाला वेग आला असून, ताब्यातील आरोपींकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येतात का, याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस सहायक निरीक्षक मीना देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरातील घरफोडीच्या घटनांना आळा घालण्याच्या दृष्टीने तपास यंत्रणेला महत्त्वपूर्ण धागेदोरे मिळाले आहेत.भडगाव रावेर तालुक्यातील खिर्डी येथे १४ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणण्यात निभोरा पोलिसांना यश आले आहेचोरीला गेला होता. याप्रकरणी निभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास करताना रावेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी (DySP) अनिल बडबुजर, निभोरा पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी मीना देशमुख आणि त्यांच्या पथकाने गोपनीय माहिती तसेच विशेष तपास यंत्रणेच्या आधारे तपासाची चक्रे फिरवली. तपासादरम्यान पोलिसांनी पाच संशयित आरोपींना ताब्यात घेतले.

डॉ. प्रकाश वानखेडे यांच्या निवासस्थानी वर्षावास प्रवचन!

प्रा. प्रितीलाल पवार यांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व अंतर्गत जळगाव तालुक्याच्या वतीने आयोजित राष्ट्रीय वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे बारावे पुष्प डॉ. प्रकाश वानखेडे यांच्या निवासस्थानी उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाले. यावेळी 'महाबोधी महाविहाराचा खरा इतिहास' या विषयावर आयु. प्रा. प्रितीलाल पवार यांनी सखोल मार्गदर्शन केले. प्रा. प्रितीलाल पवार यांनी आपल्या प्रवचनातून महाबोधी महाविहार आणि बोधीवृक्षाच्या इतिहासाचा विविध संदर्भांसह आढावा घेतला. महाबोधी महाविहार तसेच बोधीवृक्षाला इतिहासातील विविध कालखंडांत आलेल्या आव्हानांची, झालेल्या हानीची आणि त्यानंतर करण्यात आलेल्या पुनरुज्जीवनाच्या प्रयत्नांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. बौद्ध वारशाचे ऐतिहासिक महत्त्व समजून घेण्यासाठी अभ्यासपूर्ण दृष्टिकोनातून



विषय मांडण्यात आला. या प्रवचन कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा उपाध्यक्ष संस्कार विभाग आयु. रविंद्र वानखेडे, जिल्हा सचिव संस्कार विभाग आयु. भीमराव पवार, जिल्हा सचिव संरक्षण विभाग आयु. डॉ. सचिन नरवाडे, जिल्हा संघटक आद. बी. एस. पवार गुरुजी, आयु. सुभाष सपकाळे, आयु. बाबुराव वाघ, आयु. श्रीकांत बाविस्कर, आयु. गौतम वाकोडे, आयु. सोमा भालेराव, आयु. दिनकर सोनवणे, आयु. दिलीप सपकाळे, आयु. बोदडे, आयु. डी. आर. वानखेडे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच आयु. संतोष गायकवाड गुरुजी (बौद्धाचार्य), आद. ज्योतीताई भालेराव (केंद्रीय शिक्षिका), सरोजिनी लभाने ताई, तालुका अध्यक्ष आयु. राजेश इंगळे, तालुका सचिव आयु. किरण सोनवणे, आयु. जयपाल धुरंधर, आयु. किसन सपकाळे यांच्यासह परिसरातील श्रद्धाशील बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. राजेश इंगळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रकाश वानखेडे यांनी केले. कार्यक्रमाच्या मंगल प्रसंगी उपस्थितांसाठी डॉ. प्रकाश वानखेडे व वानखेडे ताई यांच्या वतीने अल्पोपहार आणि खीरदान करण्यात आले.

सेवा सेतू पर्वातून ग्राहकांना योजनांची माहिती जळगाव विभागात महावितरणचे जनजागृती अभियान

संचालक राजेंद्र पवार यांच्या हस्ते माहिती व सेवा केंद्राचे उद्घाटन

जन सम्राट टाईम्स

जळगाव ग्रामीण । (प्रतिनिधी): महावितरणच्या 'सेवा सेतू पर्वा'अंतर्गत जळगाव विभागात ग्राहक जनजागृती अभियान राबविण्यात आले. ग्राहकांना महावितरणच्या विविध सेवा, योजना आणि सुविधांची माहिती एकाच ठिकाणी मिळावी, या उद्देशाने उभारण्यात आलेल्या माहिती व सेवा केंद्राचे (Kiosk) उद्घाटन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी राजेंद्र पवार यांनी माहिती व सेवा केंद्रास भेट देऊन ग्राहक सेवा उपक्रमाची पाहणी केली. केंद्राच्या माध्यमातून ग्राहकांना उपलब्ध असलेल्या विविध सेवा व योजनांची माहिती देण्यात आली. तसेच ग्राहकांच्या विविध प्रश्नांचे आणि शंकांचे निरसन करण्यात आले. 'सूर्यघर' योजनेची विशेष जनजागृती अभियानादरम्यान प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना तसेच स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप (स्मार्ट) सोलर योजना



याबाबत ग्राहकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. घरांच्या छतावर रूफटॉप सोलर यंत्रणा बसविण्याची प्रक्रिया, उपलब्ध शासकीय योजना, ग्राहकांना मिळणारे संभाव्य फायदे तसेच सौरऊर्जेच्या माध्यमातून वीज बचत करण्याच्या उपाययोजनांची माहिती देण्यात आली. सौरऊर्जेचा अधिकाधिक वापर वाढविण्यासोबतच ग्राहकांमध्ये ऊर्जा बचतीबाबत जागरूकता निर्माण करण्यावरही या अभियानात भर देण्यात आला. महावितरणच्या सेवा, योजना आणि ग्राहकांसाठी उपलब्ध सुविधांची माहिती थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व सेवा केंद्र उपयुक्त ठरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या प्रसंगी अधीक्षक अभियंता सांगळे (जळगाव मंडळ), कार्यकारी अभियंता साळी (जळगाव विभाग), नायब तहसीलदार लाडवंजारी (प्रांत कार्यालय) यांच्यासह कापुरे, वाणी, मराठे, म्हसणे, तडवी, सपकाळे, नागरे, मोरे आदी महावितरणचे अधिकारी-कर्मचारी तसेच ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'सेवा सेतू पर्वा'च्या माध्यमातून ग्राहकांना विविध सेवा व योजनांची माहिती देण्यासोबतच सौरऊर्जा, ऊर्जा बचत आणि उपलब्ध सुविधांबाबत जनजागृती करण्याचा उपक्रम महावितरणकडून राबविण्यात येत आहे.

---

२८ सप्टेंबरला माहिती अधिकार दिन व लोकशाही दिवस साजरा करा!

जन सम्राट टाईम्स

धरणगाव। प्रतिनिधी: शासनाच्या २० सप्टेंबर २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार २८ सप्टेंबर हा माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून धरणगाव पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात २८ सप्टेंबर रोजी माहिती अधिकार दिन व लोकशाही दिवस साजरा करण्यात यावा, अशी मागणी माहिती अधिकार फेडरेशनच्या वतीने करण्यात आली.

यासंदर्भात माहिती अधिकार फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी धरणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गायकवाड यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ बाबत नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती व्हावी, नागरिकांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांची माहिती मिळावी, तसेच शासकीय कामकाजात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व



वाढावे, यासाठी २८ सप्टेंबर रोजी जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली. नागरिकांना अधिकारांची माहिती देण्याची गरज माहितीचा अधिकार कायद्यामुळे नागरिकांना शासकीय कामकाजाशी संबंधित माहिती मागविण्याचा महत्त्वपूर्ण अधिकार प्राप्त झाला आहे. या अधिकाराचा योग्य आणि प्रभावी वापर कसा करावा, माहितीचा अर्ज कसा करावा, नागरिकांना कोणत्या बाबींची माहिती मागता येते, याबाबत मार्गदर्शन मिळणे आवश्यक असल्याचे फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. लोकशाही व्यवस्थेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी माहितीचा अधिकार महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे शासन निर्णयानुसार २८ सप्टेंबर रोजी माहिती अधिकार दिन प्रभावीपणे साजरा करून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी माहिती अधिकार फेडरेशनचे जळगाव जिल्हा प्रचार प्रमुख मोहन शिंदे, तालुका अध्यक्ष प्रेमराज पाटील, सदस्य कैलास महाजन आणि राजेंद्र मोरे उपस्थित होते.

धुळ्यात दुष्काळाची दाहकता वाढली; पावसाअभावी पिकांची अवस्था बिकट

वरझडीतील शेतकऱ्यांनी कपाशीच्या शेतात सोडली जनावरे; पंचनाम्यांसह तातडीच्या मदतीची मागणी

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यात पावसाचा खंड पडल्याने खरीप पिकांसमोर गंभीर संकट निर्माण झाले आहे. कापूस, मका यासह विविध पिकांच्या वाढीवर परिणाम झाला असून अनेक शेतांमध्ये पिके करपण्याच्या अवस्थेत पोहोचली आहेत. पावसाअभावी उत्पादनाची आशा मावळत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. या परिस्थितीचे गांभीर्य शिंदखेडा तालुक्यातील वरझडी येथे प्रकर्षाने समोर आले आहे. उत्पादन मिळण्याची शक्यता कमी झाल्याने काही शेतकऱ्यांनी आपल्या कपाशीच्या शेतात जनावरे सोडून पीक चरण्यासाठी मोकळे केले. उत्पादनातून उत्पन्न मिळण्याची शक्यता नसताना किमान जनावरांच्या चाऱ्याची सोय व्हावी, या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात आल्याचे वृत्त आहे. या घटनेचा व्हिडिओही समोर आला आहे. पावसाच्या प्रतीक्षेत खरीप हंगाम शिंदखेडा तालुक्यात पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांची वाढ खुंटल्याचे आणि पिके जळू लागल्याचे स्थानिक वृत्तांमध्ये नमूद करण्यात आले आहे. भारतीय किसान संघासह विविध संघटनांनी प्रशासनाकडे तालुक्यातील परिस्थितीची पाहणी करून दुष्काळसदृश परिस्थितीचा विचार करावा, अशी मागणी केली आहे. शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागत, बियाणे, खते, औषधे आणि मजुरीवर



खर्च केला आहे. मात्र पिकांना निर्णायक टप्प्यावर पाणी मिळत नसल्याने हा खर्च वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रशासनाने प्रत्यक्ष शेतपातळीवर पाहणी करून नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करावेत, अशी मागणी पुढे येत आहे. शेतकऱ्यांचा सवाल : मदत कधी मिळणार? एकीकडे शेतकरी पिकांच्या नुकसानीमुळे आर्थिक अडचणीत असल्याचे चित्र असताना दुसरीकडे लोकप्रतिनिधींच्या वाढदिवसांच्या कार्यक्रमांवर मोठ्या प्रमाणात खर्च होत असल्याचा आरोप काही शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे. "शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष कधी दिले जाणार?", असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. या आरोपांबाबत संबंधित लोकप्रतिनिधींची भूमिका स्वतंत्रपणे समोर आलेली नाही. सध्याच्या परिस्थितीत पिकांचे वस्तुनिष्ठ नुकसान मूल्यांकन, आवश्यक पंचनामे, पीकविमा आणि शासनाच्या नियमांनुसार उपलब्ध मदतीबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी शेतकरी करीत आहेत. पावसाचा पुढील काळातील प्रतिसाद आणि प्रशासनाकडून होणाऱ्या पाहणीवर शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

खरीप पिकांसमोर गंभीर संकट निर्माण झाले आहे. कापूस, मका यासह विविध पिकांच्या वाढीवर परिणाम झाला असून अनेक शेतांमध्ये पिके करपण्याच्या अवस्थेत पोहोचली आहेत. पावसाअभावी उत्पादनाची आशा मावळत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.या परिस्थितीचे गांभीर्य शिंदखेडा तालुक्यातील वरझडी येथे प्रकर्षाने समोर आले आहे. उत्पादन मिळण्याची शक्यता कमी झाल्याने काही शेतकऱ्यांनी आपल्या कपाशीच्या शेतात जनावरे सोडून पीक चरण्यासाठी मोकळे केले. उत्पादनातून उत्पन्न मिळण्याची शक्यता नसताना किमान जनावरांच्या चाऱ्याची सोय व्हावी, या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात आल्याचे वृत्त आहे. या घटनेचा व्हिडिओही समोर आला आहे. पावसाच्या प्रतीक्षेत खरीप हंगाम शिंदखेडा तालुक्यात पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांची वाढ खुंटल्याचे आणि पिके जळू लागल्याचे स्थानिक वृत्तांमध्ये नमूद करण्यात आले.

गरताड बारीच्या जंगलात जळालेल्या अवस्थेत मृतदेह

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: धुळे तालुक्यातील गरताड बारीच्या जंगल परिसरात एका महिलेचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. महिलेची हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह जाळण्यात आला असावा, असा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण पोलिसांच्या तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. गरताड बारीच्या जंगलात जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याची माहिती मिळताच मोहाडी पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपासाला सुरुवात केली आहे. मृतदेह पूर्णपणे जळालेल्या अवस्थेत असल्याने मृत महिलेची ओळख पटविणे पोलिसांसमोर मोठे आव्हान ठरले आहे. मोहाडी पोलिसांकडून मृत महिलेची ओळख पटविण्यासाठी विविध पातळ्यांवर तपास सुरू करण्यात आला आहे. परिसरातील बेपत्ता व्यक्तींची माहिती तसेच इतर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या घटनेमागे नेमके कारण काय, महिलेचा मृत्यू नेमका कधी आणि कशामुळे झाला, तसेच या प्रकरणात कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करीत आहेत. घटनास्थळावरून मिळणारे पुरावे आणि तपासातील निष्कर्षांनंतर या घटनेचे गूढ उकलण्याची शक्यता आहे.

शिक्षक-पालक सभेत प्रश्नांना व्यासपीठ; विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह सर्वांगीण विकासावर चर्चा

इंदिरा गांधी व आदर्श माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त सभेला विक्रमी पालक उपस्थिती

जन सम्राट टाईम्स

धरणगाव। प्रतिनिधी: विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, शिस्त, सुरक्षितता आणि सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षक व पालकांमध्ये सातत्यपूर्ण संवाद असणे आवश्यक आहे. याच उद्देशाने इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय व आदर्श माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक-पालक सभेचे आयोजन करण्यात आले. इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालयात झालेल्या या सभेला पालकांचा उत्स्फूर्त आणि विक्रमी प्रतिसाद मिळाला.

सभेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या सुरेखा पाटील होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून सचिव तथा आदर्श विद्यालयाचे अध्यक्ष सी. के. पाटील, पत्रकार अविनाश बाविस्कर, पंढरीनाथ पाटील, छाया बिऱ्हाडे, गणेश झुंझाररराव, सरला पाटील, प्रा. आर. एन. भदाणे तसेच उपप्राचार्य ए. एस. पाटील उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करून सभेची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकात मुख्याध्यापक संदीपकुमार सोनवणे यांनी शिक्षक-पालक सभेचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासोबतच त्यांच्यात शिस्त, जबाबदारी आणि सुरक्षिततेची जाणीव निर्माण करण्यासाठी पालक व शिक्षकांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावेळी पालकांनी विविध प्रश्न व समस्या थेट सभेत मांडल्या.



विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, शिस्त, मोबाईलचा वाढता वापर, अभ्यासाचे नियम, शाळेत ये-जा करताना येणाऱ्या अडचणी, विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि प्रवासातील समस्या यांसह विविध विषयांवर पालकांनी मते मांडली.

त्यामुळे सभा केवळ औपचारिक न राहता पालकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ मिळाले. पर्यवेक्षिका भारती पाटील आणि ज्येष्ठ शिक्षक किरण चव्हाण यांनी पालकांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी घर आणि शाळा यांच्यात समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी सचिव तथा आदर्श विद्यालयाचे अध्यक्ष सी. के. पाटील यांनी पालकांनी उपस्थित केलेल्या शैक्षणिक, शिस्तीविषयक तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित प्रश्नांचे निरसन केले. विद्यार्थ्यांच्या हिताशी निगडित प्रत्येक प्रश्न गांभीर्याने घेण्यात येईल. संबंधित समस्या सोडविण्यासाठी आवश्यक त्या तातडीच्या आणि ठोस उपाययोजना केल्या जातील, तसेच पालकांनी दिलेल्या सूचना विद्यालयाच्या नियोजनात सकारात्मकपणे विचारात घेतल्या जातील, असे आश्वासन त्यांनी दिले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्या सुरेखा पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्यात सातत्यपूर्ण संवाद असणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालयाच्या विविध उपक्रमांमध्ये पालकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. पालकांच्या समस्या, अपेक्षा आणि सूचनांना खुले व्यासपीठ मिळाल्याने सभा सकारात्मक आणि विधायक वातावरणात पार पडली. या संवादामुळे शिक्षक-पालकांमधील समन्वय अधिक दृढ होऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सुरक्षितता व व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती जैन यांनी केले, तर आभार बाबाजी मासूळ यांनी मानले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

दुष्काळाच्या झळा; शिवसेना शेतकऱ्यांच्या बांधावर!



जन सम्राट टाईम्स

बुरझड/धुळे, | प्रतिनिधी: धुळे जिल्ह्यातील बुरझड परिसरात निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीमुळे शेतकरी संकटात सापडला आहे. पावसाअभावी पिकांची झालेली अवस्था आणि शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. या संकटाच्या काळात शिवसेना शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याची ग्वाही यावेळी पदाधिकाऱ्यांनी दिली. पदाधिकाऱ्यांनी परिसरातील विविध शेतांमध्ये जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. पावसाअभावी पिकांची झालेली दयनीय अवस्था, उत्पादनावर होणारा परिणाम आणि त्यातून निर्माण झालेली आर्थिक अडचण याबाबत शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्यात आला. शेतकऱ्यांनीही दुष्काळी परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या विविध समस्यांची माहिती पदाधिकाऱ्यांना दिली. पावसाने ओढ दिल्याने शेती व्यवसायावर मोठे संकट निर्माण झाले असून, शेतकऱ्यांना तातडीच्या शासकीय मदतीची आवश्यकता आहे. त्यामुळे प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत आणि पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या निकषानुसार योग्य ती आर्थिक मदत व नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ कागदोपत्री नोंदवून न ठेवता प्रत्यक्ष बांधावर जाऊन परिस्थिती जाणून घेणे आवश्यक असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडत असताना शासन व प्रशासनाने संवेदनशीलपणे निर्णय घेऊन तातडीने मदतीचा हात पुढे करावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. या पाहणी दौऱ्यात शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल भाऊ सोनवणे, जिल्हा संघटक प्रशांत भदाणे, जिल्हा उपजिल्हाप्रमुख निंबा नाना मराठे, तालुकाप्रमुख बाबाजी पाटील, हेमराज पाटील, जिल्हा युवा अधिकारी कुणाल कानकाटे, संदीप चौधरी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जगन जाधव, माजी सरपंच अशोक नागमल आणि शाखाप्रमुख दिनेश बागुल यांच्यासह परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या संकटाच्या काळात प्रत्यक्ष शेताच्या बांधावर पोहोचून परिस्थिती जाणून घेतल्याने या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले. प्रशासनाकडून आता पंचनामे व मदतीबाबत कोणती कार्यवाही केली जाते, याकडे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

चौगावच्या व्ही. एन. पाटील विद्यालयात चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

सामाजिक जाणिवांसह कलागुणांना मिळाले व्यासपीठ

जन सम्राट टाईम्स

चौगाव। प्रतिनिधी: शासनाच्या व शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'सेवा सप्ताह' अभियानांतर्गत व्ही. एन. पाटील माध्यमिक विद्यालय, चौगाव येथे विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत आपल्या कल्पकतेला रंगांची जोड देत विविध चित्रे साकारली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देतानाच त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने स्पर्धेसाठी 'स्वच्छ भारत, सुंदर भारत', 'पर्यावरण रक्षण', 'जल जतन' आणि 'सामाजिक सेवा' यांसारखे प्रेरणादायी विषय देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या विषयांवर आपल्या कल्पना चित्रांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडल्या.



कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. राजेंद्र बोराळकर तसेच प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमापूजनाने झाली. यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 'सेवा सप्ताहा'चे महत्त्व समजावून सांगत स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, पाण्याचे संवर्धन आणि सामाजिक सेवेसारख्या विषयांबाबत मार्गदर्शन केले. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. कागदावर विविध रंगांची उधळण करत विद्यार्थ्यांनी सामाजिक संदेश देणारी आकर्षक चित्रे साकारली. त्यांच्या कलाकृतींमधून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांचे प्रभावी दर्शन घडले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे परीक्षण करण्यासाठी विद्यालयातील कलाशिक्षिका सौ. एस. ए. बागले मॅडम, श्रीमती संघमित्रा सामुद्रे मॅडम तसेच इतर शिक्षकांनी सर्व चित्रांचे बारकाईने निरीक्षण केले. स्पर्धेतील उत्कृष्ट चित्रांची निवड करण्यात येणार असून, आगामी कार्यक्रमात उत्कृष्ट चित्रकार विद्यार्थ्यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. 'सेवा सप्ताहा'च्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्यासाठी व्यासपीठ मिळाले. स्वच्छता, पर्यावरण रक्षण, जलसंवर्धन आणि सामाजिक सेवा यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांबाबत विद्यार्थ्यांच्या मनात सकारात्मक जाणीव निर्माण झाली.

उद्या बच्चू कडू यांचा 'शिवसंवाद दौरा'

दिव्यांग, गोरगरीबांसह विविध सामाजिक घटकांशी साधणार संवाद

जन सम्राट टाईम्स



पाचोरा (प्रतिनिधी): संघटनात्मक बांधणीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने पाचोरा येथे गुरुवारी (दि. २४) 'शिवसंवाद दौऱ्या'चे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेनेचे नेते तथा माजी मंत्री आणि विधान परिषद सदस्य बच्चू कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी १० वाजता जुना सारोळा रोडवरील समर्थ लॉन्स येथे हा कार्यक्रम होणार आहे. शेतकरी, गोरगरीब, दिव्यांग तसेच विविध सामाजिक घटकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्याशी संवाद साधणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. यावेळी नागरिक व कार्यकर्त्यांशी बच्चू कडू यांच्यासह जळगाव लोकसभा मतदारसंघाचे संपर्कप्रमुख आमदार दिलीप लांडे आणि पाचोरा-भडगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार किशोर आप्पा पाटील संवाद साधणार आहेत. कार्यक्रमात मतदारसंघातील विविध प्रश्न, शेतकऱ्यांच्या अडचणी, दिव्यांगांच्या समस्या तसेच सामाजिक घटकांच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. नागरिकांना आपले प्रश्न थेट मांडण्याची संधी या संवादातून मिळणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. या कार्यक्रमास जळगाव लोकसभा मतदारसंघाचे संपर्कप्रमुख आमदार दिलीपमामा लांडे, रावेर लोकसभा मतदारसंघाचे संपर्कप्रमुख आमदार तुकाराम काते तसेच पाचोरा-भडगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार किशोर आप्पा पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याशिवाय शिवसेना, युवासेना, महिला आघाडी तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. संघटनात्मक पातळीवर कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याबरोबरच सामाजिक प्रश्न समजून घेण्यासाठी हा दौरा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. पाचोरा-भडगाव विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी, दिव्यांग बांधव तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रावसाहेब मनोहर पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.संघटनात्मक बांधणीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने पाचोरा येथे गुरुवारी (दि. २४) 'शिवसंवाद दौऱ्या'चे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेनेचे नेते तथा माजी मंत्री आणि विधान परिषद सदस्य बच्चू कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी १० वाजता जुना सारोळा रोडवरील समर्थ लॉन्स येथे हा कार्यक्रम होणार आहे. शेतकरी, गोरगरीब, दिव्यांग तसेच विविध सामाजिक घटकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्याशी संवाद साधणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. कार्यकर्त्यांशी बच्चू कडू यांच्यासह जळगाव लोकसभा मतदारसंघाचे संपर्कप्रमुख आमदार दिलीप लांडे आणि पाचोरा-भडगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार किशोर आप्पा पाटील संवाद साधणार आहेत.

नाहाटा महाविद्यालयात बी.ए. फ्रेशर पार्टी; नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत!

जन सम्राट टाईम्स

भुसावळ। प्रतिनिधी: भुसावळ येथील कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा महाविद्यालयातील मानव्यविद्या शाखेच्या प्रथम वर्ष बी.ए. वर्गात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी 'फ्रेशर पार्टी'चे उत्साहात आयोजन करण्यात आले. नवागत विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन जीवन आनंददायी वातावरणात सुरू व्हावे, तसेच विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्यासाठी व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. जी. आर. वाणी, तर प्रमुख वक्ते म्हणून मानव्यविद्या शाखेचे उपप्राचार्य डॉ. डी. एन. पाटील उपस्थित होते. प्रारंभी मान्यवर व प्राध्यापकांच्या हस्ते सरस्वती पूजन, प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. डी. एन. पाटील यांनी प्रथम वर्ष मानव्यविद्या शाखेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना



मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन जीवनातील संधींचा योग्य उपयोग करून शैक्षणिक प्रगतीसोबतच व्यक्तिमत्त्व विकास साधावा, असे आवाहन करत त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणात डॉ. जी. आर. वाणी यांनी मानव्यविद्या शाखेचे महत्त्व अधोरेखित केले. भाषा, संस्कृती, अर्थशास्त्र, भूगोल, राज्यशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, संगीत आणि तत्त्वज्ञान अशा विविध विषयांचा एकत्रित अभ्यास विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा व्यापक करतो. भारतीय प्रशासकीय सेवेसह विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या अनेक अधिकाऱ्यांच्या घडणीत मानव्यविद्या शाखेचे शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते, असे त्यांनी स्पष्ट केले. यानंतर विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. प्रणाली हिवरे, अभिजित देहाडे आणि पूनम ठाकरे यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी वैयक्तिक तसेच समूह नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. त्यानंतर मिमिक्रीसह विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. फ्रेशर पार्टीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी संगीत खुर्ची, फुगे फोडणे, स्टिकर काढणे आदी विविध खेळ घेण्यात आले. या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या देवेंद्र भारंबे, स्वरा बेलोकर आणि मानव सावळे यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

पाचोरा-भडगावच्या शेतकऱ्यांना 45.48 कोटींची वाढीव मदत!

जिरायती दराऐवजी बागायतीप्रमाणे भरपाई; आ.किशोर पाटील यांच्या पाठपुराव्यानंतर शासनाचा निर्णय

जन सम्राट टाईम्स

पाचोरा। प्रतिनिधी: सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पाचोरा-भडगाव तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अखेर बागायती क्षेत्राप्रमाणे वाढीव नुकसानभरपाई मिळणार आहे. राज्य शासनाने दोन्ही तालुक्यांसाठी ४५ कोटी ४८ लाख ७६ हजार रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर केला असून, याबाबत २१ सप्टेंबर २०२६ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. मंजूर निधी संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर डीबीटीद्वारे जमा करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पाचोरा-भडगाव विधानसभा मतदारसंघातील कापूस पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. सुरुवातीला काही नुकसानग्रस्त क्षेत्राची नोंद जिरायती म्हणून झाल्याने संबंधित शेतकऱ्यांना जिरायती दराने नुकसानभरपाई देण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात अनेक शेतकऱ्यांचे क्षेत्र बागायती असल्याने बागायती दराप्रमाणे वाढीव मदत मिळावी, अशी मागणी करण्यात आली होती. उपलब्ध वृत्तानुसार जिरायती दर ₹८,५०० प्रति हेक्टर तर बागायती दर ₹१७,००० प्रति हेक्टर असा फरक होता. आमदार किशोर पाटील यांचा पाठपुरावा शेतकऱ्यांना बागायती क्षेत्राप्रमाणे नुकसानभरपाई मिळावी यासाठी आमदार किशोर पाटील यांनी शासनाकडे पाठपुरावा केला. प्रशासनाकडून सुधारित पंचनामे



व अहवाल तयार करून घेण्यात आल्याचे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांच्याकडे मागणी मांडल्याचे वृत्त आहे. त्यानंतर मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत या मागणीला मंजुरी मिळाल्याचे नमूद करण्यात आले आहे. पाचोऱ्यासाठी २७.२३ कोटी मंजूर निधीमध्ये पाचोरा तालुक्यासाठी एकूण २७ कोटी २२ लाख ९२ हजार रुपये देण्यात येणार आहेत. यामध्ये ० ते २ हेक्टर क्षेत्रासाठी २६ कोटी ५० लाख रुपये, तर २ ते ३ हेक्टरच्या वाढीव क्षेत्रासाठी ७२ लाख ९० हजार रुपयांचा समावेश आहे. भडगावला १८.२५ कोटी भडगाव तालुक्यासाठी १८ कोटी २५ लाख ८४ हजार रुपये मंजूर झाले आहेत. यामध्ये ० ते २ हेक्टर क्षेत्रासाठी १४ कोटी ६० लाख ६७ हजार रुपये, तर २ ते ३ हेक्टरच्या वाढीव क्षेत्रासाठी ३ कोटी ६५ लाख १७ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. डीबीटीद्वारे थेट खात्यावर रक्कम मंजूर वाढीव नुकसानभरपाई थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणालीद्वारे संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहे. तसेच नैसर्गिक आपत्तीपोटी मिळणारा हा मदतनिधी जुन्या कर्जाच्या वसुलीसाठी वळता करू नये, असे जिल्हा प्रशासनाला निर्देश देण्यात आल्याचे वृत्त आहे. 'शेतकऱ्यांचे अश्रू पुसणे हे प्रथम कर्तव्य' यासंदर्भात आमदार किशोर पाटील यांनी, अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना जिरायती दराने मदत मिळणे योग्य नव्हते, त्यामुळे बागायती क्षेत्राचा योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याचे म्हटले आहे. शासनाने वाढीव मदत मंजूर केल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे आभार मानले. दरम्यान, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी पाचोरा-भडगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना मदत मिळावी या उद्देशाने विभागाने हा निर्णय घेतल्याचे सांगितले असून, शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी पुढेही काम करण्याचे नमूद केले आहे. या वाढीव निधीमुळे अतिवृष्टीच्या नुकसानीनंतर आर्थिक अडचणीत सापडलेल्या पाचोरा-भडगाव तालुक्यातील संबंधित कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. जळगाव जिल्हा प्रशासनाने यापूर्वी सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टीबाधित पाचोरा आणि भडगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अनुदान वाटपाच्या याद्याही प्रसिद्ध केल्या आहेत.

तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत हर्षल सोनवणे प्रथम!

जन सम्राट टाईम्स

धरणगाव | प्रतिनिधी: क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत तालुका क्रीडा संकुल, धरणगाव येथे आयोजित तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत आदर्श माध्यमिक विद्यालय, धरणगावचा इयत्ता दहावीतील विद्यार्थी हर्षल दत्तात्रय सोनवणे याने उल्लेखनीय कामगिरी करत १७ वर्षांखालील ग्रीको-रोमन शैलीतील ६५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावला. हर्षलने कुस्तीच्या आखाड्यात आत्मविश्वास, ताकद आणि कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. स्पर्धेतील यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीपकुमार सोनवणे यांनी हर्षलचे अभिनंदन करून त्याच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे अध्यक्ष सी. के. पाटील, सचिव सुरेखा पाटील, संचालक मच्छिंद्र पाटील, आशिषकुमार पाटील आणि अश्विनकुमार पाटील यांनी हर्षलचे कौतुक करत त्याचे अभिनंदन केले. भविष्यातही त्याने अशीच दमदार कामगिरी करून विद्यालयाचे तसेच धरणगावचे नाव उज्ज्वल करावे, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी धरणगाव येथे विद्यार्थी हर्षल दत्तात्रय सोनवणे याने उल्लेखनीय कामगिरी करत १७ वर्षांखालील ग्रीको-रोमन शैलीतील ६५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावला. हर्षलने कुस्तीच्या आखाड्यात आत्मविश्वास, ताकद आणि कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली.